नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक : २५/०६/२०२६

पुणे महानगरपालिका
मा.स्थायी समिती
दाखल कार्यपत्रिका

विषय क्र. ३३२त्वर्य

पुणे महानगरपालिका अंतर्गत नव्याने समाविष्ट १२ गावांच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी पर्यावरण व सामाजिक परिणाम मुल्यांकन (Environment & Social Impact Assessment - ESIA) अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची निवड करणेसाठी तज्ञ प्रकल्प सल्लागार नेमणूक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ०५ टेंडर्स पैकी ठेकेदार / सल्लागार मे.Deloitte Touch Tohmatsu India LLP, यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने यांचे कडून र. रु. ३६,३२,७४०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पा.पु./१९१, दि. १९/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३३त्वर्य

पुणे कॅन्टोनमेंट हद्दीतील कॅन्टोनमेंट ऑफीस ते भैरोबा नालापर्यत पुणे सोलापुर रस्ता पुनःडांबरीकरण करणे (जुना नादुरूस्त रस्ता पावसाळी लाईनसह विकसित करणे) व शिवरकर मुख्य रस्ता विकसित करणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडरच्या ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी मे. Structsource Engineering Solutions यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१९२, दि. २२/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३४त्वर्य

प्र.क्र. २५ वानवडी काळुबाई मंदिर ते अभ्युदय सोसायटी, वानवडी ताडीमळा व भैरोबा नाला वानवडी येथील पुल नवीन बांधणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडरच्या ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी मे. Structsource Engineering Solutions यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१९३, दि. २२/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३५त्वर्य

कोथरूड येथील शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे बालनाट्यगृह येथील म्युरल विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S BAALAARK यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५९३२२०२/- पेक्षा १.५००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८४३२१८=९७ अधिक जी.एस.टी. र.रु.१०५१७७९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.६८९४९९७=९७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून,काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/१९४, दि. २४/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३६त्वर्य

प्र.क्र.३५ मधील सिंहगड रोड वडगांव बु, स.नं.३५ ते ४०(पार्ट) येथील जागेवर श्री. छत्रपती शिवाजी राजे भोसले सांस्कृतिक भवन आणि कलामंदिर येथे अग्निशामक विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. LOGITECH FIRE TECHNOLOGY यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.११८६४२०६/- पेक्षा १६.२५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९३६२७२=५३ अधिक जी.एस.टी. र.रु.१७८८५२९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.११७२४८०१=५३ पर्यंत अधिक विशेष भाववाढ सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/भवन/१९५, दि. २४/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३७त्वर्य

छत्रपती संभाजीराजे उद्यानामधील छ. संभाजीराजे यांच्या पुतळ्यास सुशोभीकरण करणे अंतर्गत स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ARUN K JAIN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७१९९१३४/- पेक्षा .९९ % ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७१२७८६२=५७ अधिक जी.एस.टी. र.रु.१२८३०१५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.८४१०८७७=५७ पर्यंत अधिक विशेष भाववाढ सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (३०-०४-२०२६) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१९८, दि. २४/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३८त्वर्य

पुणे महानगरपालिका मुख्य इमारत येथे नूतनीकरण व सुशोभीकरण मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील स्थापत्य विषयक कामे ठेकेदार श्री तेजस मंडलेचा यांचेकडून र. रु. १,२९,५१,०६४/- या पूर्वगणन रकमेच्या ५.५०% कमी दराने र.रु. १,२२,३८,७५५/- अधिक जी.एस.टी. र.रु.२२,०२,९७७/-

पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.१९,४४०/- पर्यंत अशी एकूण र.रु. १,४४,६१,१७३/- पर्यंत पश्चात मान्यता मिळणेस व त्यानुसार प्रत्यक्ष मोजमापानुसार करण्यात आलेल्या, कामांचे बिल (जी.एस.टी. सह) करारनामा न करता अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील संविदा ५ (२)(२) नुसार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन /२०१, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ३३९त्वर्य

मा.कोमल सारंग नवले यांचे, दि. २३/०६/२०२६ चे पत्र

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून पुण्यामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे टँकर भरण्याकरिता वाल्व उपलब्ध आहेत. त्या वाल्व मधून पुणे महानगरपालिकेचे पाण्याचे टँकर व खाजगी टँकर नियमानुसार काही रक्कम आकारून खाजगी टँकर धारकांना पाण्याचे टँकर भरू दिले जातात. असा निर्णय झाला असताना देखील आमच्या प्रभाग क्रमांक ३४ मध्ये उपलब्ध असलेल्या महानगरपालिकेच्या वाल्व्ह मधून खाजगी पाण्याच्या टँकर वाल्यांना महापालिकेच्या नियमानुसार काही रक्कम आकारून टँकर भरून दिले जात नाहीत.

सध्याच्या परिस्थितीमध्ये दिवसाआड पाणी येत असल्याने पाण्याकरिता नागरिकांना मोठ्या प्रमाणामध्ये पाणी समस्या भेडसावत आहे. अशा परिस्थितीमध्ये अनेक टँकर धारक वेगवेगळ्या ठिकाणावरून खाजगी वाल्व मधून पाण्याचे टँकर भरून घेतात. काही ठिकाणचे पाणी हे दुषित असल्याने नाविलाजास्तव नागरिकांना विकत घ्यावे लागते. हे दुषित पाणी पिल्याने नागरिकांना आरोग्याची समस्या तयार होऊ शकते.

हे सर्व प्रकार टाळण्याकरिता व नागरिकांची आरोग्याची काळजी घेण्याकरिता, प्रथम महानगरपालिकेचे टँकर भरून दिल्यानंतर हे खाजगी पाण्याचे टँकर महानगरपालिकेच्या नियमानुसार चार्जेस आकारून भरून दिले जावेत. वडगाव धायरी मधील पाण्याचे टँकर भरण्याच्या वाल्व मधून महानगरपालिकेच्या टँकर बरोबर खाजगी टँकर धारकांना महानगरपालिकेच्या नियमानुसार रक्कम आकारून खाजगी पाण्याचे टँकर भरून मिळण्यास मान्यता मिळावी.

विषय क्र. ३४०त्वर्य

मा.अतुल नारायण तरवडे व मा.प्राची आल्हाट यांचे, दि. २३/०६/२०२६ चे पत्र.

पुणे शहरातील पीपीपी मॉडेल अंतर्गत सुरु असलेल्या विकासकामांना गती मिळण्यासाठी, कामांची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच विविध प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होण्यासाठी पीपीपी (Public-Private Partnership) मॉडेल अंतर्गत विकासकामांच्या संदर्भात बिल्डरांकडून देय रक्कम ५०% रोख स्वरुपात व ५०% क्रेडीटनोट द्वारे विकासकामांच्या चलनाद्वारे स्वीकारण्यास. मान्यता देण्यात यावी.

विषय क्र. ३४१त्वर्य

मा.प्रशांत जगताप व मा.विशाल धनवडे यांचे, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

पुणे पेठ वानवडी स. नं. – ५३ व ५४ मधून जगताप चौकात पूर्वेकडे प्रस्तावित १८ मी.डी.पी. रस्ता SRPF कॅम्पस मध्ये जातो. पुणे पेठ वानवडी स.नं. ५३ व ५४ मधील SRPF ने सदर रस्ता नागरिकांना वापरण्यास मज्जाव केला असल्याने स.नं. ५३ मधील रहिवाश्यांना जाण्या – येण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. सदर १८ मी.डि.पी. रस्त्याची स. नं ५४ मधील अस्तित्वातील प्रवेशद्वारा अगोदरील ब्रिज ते अमित शेलार यांचे घराच्या मागील सिमाभिंती पर्यंत ९ मीटर रुंदीचा रस्ता वाढवून तसेच ओढ्यावरही पूल वाढवून सदर १८ मी.डी.पी रस्त्याची रुंदी मुंबई मनपा अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये रस्तारुंदी वाढविण्यात यावी व वाढीव रस्तारुंदीची जागा ताब्यात घेऊन रस्ता विकसित करण्यात यावा.

विषय क्र. ३४२त्वर्य

मा.कालिंदा पुंडे व मा.प्राची अल्हाट यांचे, दि. २३/०६/२०२६ चे पत्र.

पुणे पेठ वानवडी मधील आझाद नगर सर्व्हे नं. ५७ ओरा सोलीस सोसायटी ते गुरुकृपा निवास पर्यंत चा रोड हा सदर परिसर वाढती रहदारी व वाढती लोकवस्ती लक्ष्यात घेता सदर ठिकाणी असलेल्या रस्त्याचे रुंदीकरण करणे अवश्यक असल्याने सदर रस्ता सार्वजनिक वाहतुकीचा महत्वाचा घटक आहे. सदर ठिकाणी सद्य स्थितीला अस्तित्वात असलेल्या रस्त्याची रुंदी ८ मीटर व काही ठिकाणी ८ मीटर पेक्षा कमी आहे. नागरिकांना सुरक्षित व सुरळीत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कलम २१० (१) (ब) नुसार रस्त्याचे रुंदी ९ मीटर करण्यासाठी मान्यता देण्यात यावी व त्या अनुषंगाने पुढील प्रक्रिया सुरु करण्यात यावा.

विषय क्र. ३४३त्वर्य

मा.देवेंद्र वडके व मा.राजेंद्र काकडे यांचे, दि. २४/०६/२०२६ चे पत्र.

पुणे शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई निर्माण झाली असून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात पाणीसाठा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने सध्या एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असून तो शहराच्या अनेक भागात अनियमित आहे, काही ठिकाणी चार दिवसातून एकदा पाणी येत आहे. यावर उपाय म्हणजे शहराच्या जमिनीखाली असलेला पाणीसाठा म्हणजे पुर्वीच्या काळी शहरात मोठ्या प्रमाणावर विहीरी, सार्वजनिक पाण्याचे हौद, पेशवेकालीन कात्रज ते शनिवारवाडा पाणीपुरवठा योजना अस्तित्वात होते, पण काळाच्या ओघात हे पाणी पुरवठा करणारे स्त्रोत बुजविले गेल्याने बहुतांशी पाण्याचा स्त्रोत हा धरणातून होणाऱ्या पाणीपुरवठावर अवलंबून आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी हा वापर सोडल्यास इतर वापरासाठी शहरातील जमिनीखालील असणाऱ्या पाणी स्त्रोत वापरता येणे शक्य आहे. त्यासाठी हातपंपाद्वारे वापरले जाणारे उपसा केंद्र ठिकठिकाणी चालू करणे आवश्यक आहे.

तरी प्रत्येक प्रभागामध्ये हातपंपाद्वारे वापरले जाणारे उपसा केंद्र चालू करण्यास मान्यता द्यावी यासाठी नगरसेवकांच्या "स" यादीतील तरतूदीतुन निधी खर्च करण्यास मान्यता द्यावी तसेच यासाठी

एकदा चालू केल्यानंतर देखभाल खर्च नसल्याने तो परवडण्यासारखे आहे. तसेच जेथे पाणीपुरवठा होत नाही, कमी आहे तेथील नागरिकांना त्वरीत पाण्याची सोय उपलब्ध होणार आहे.

विषय क्र. ३४४त्वर्य

मा.सुहास विजय टिंगरे यांचे, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

विषय : पुणे शहरातील दाट लोकवस्ती, झोपडपट्टया, बाजारपेठा व गर्दीच्या भागांमध्ये फायर हायड्रंट प्रणाली उभारणे व विद्यमान हायड्रंट कार्यान्वित करणे. निधीची आर्थिक तरतुद करण्यात यावी

पुणे शहराची वाढती लोकसंख्या, अरुंद रस्ते, दाट झोपडपट्टया, जुन्या पेठा, व्यापारी संकुले आणि वाढती वाहतूक यामुळे आग लागल्यास अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहोचण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. अनेक वेळा अग्निशमन वाहनांना आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास विलंब होतो, ज्यामुळे जीवित व वित्तहानी वाढण्याची शक्यता असते. यावर प्रभावी उपाय म्हणून शहराच्या पाणीपुरवठा जाळयाशी जोडलेली फायर हायड्रंट प्रणाली उभारणे अत्यावश्यक आहे. ही प्रणाली विकसित झाल्यास अग्निशमन दलाला घटनास्थळी त्वरित व सतत पाणीपुरवठा मिळू शकेल आणि आग नियंत्रणासाठी लागणारा वेळ कमी होईल.

त्यामुळे पुणे शहरातील सर्व विद्यमान फायर हायड्रंटचे सर्वेक्षण करून त्यांची सद्यस्थिती निश्चित करण्यात यावी. कार्यरत नसलेले हायड्रंट तात्काळ दुरुस्त करून वापरासाठी उपलब्ध करण्यात यावेत. झोपडपट्ट्या, दाट लोकवस्तीचे भाग, पेठ क्षेत्रे, बाजारपेठा, औद्योगिक क्षेत्रे व उच्च जोखमीच्या ठिकाणी टप्प्याटप्याने नवीन फायर हायड्रंट उभारण्यात यावेत. पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व अग्निशमन विभाग यांच्यात समन्वय साधून स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्यात यावा. सर्व फायर हायड्रंटचे GIS आधारित डिजिटल मॅपिंग करण्यात यावे. प्रत्येक हायड्रंटची नियमित तपासणी, देखभाल व वार्षिक सुरक्षा लेखापरीक्षण बंधनकारक करण्यात यावे. झोपडपट्टी व दाट वस्ती भागांमध्ये लहान व्यासाच्या अग्निशमन होज लाईन व आपत्कालीन पाणी बिंदू विकसित करण्याची योजना तयार करण्यात यावी. नागरिक, स्वयंसेवी संस्था व स्थानिक मंडळांच्या सहभागातून प्राथमिक अग्निसुरक्षा जनजागृती कार्यक्रम राबविण्यात यावेत.

अलीकडील काळात शहरातील विविध भागांमध्ये लागलेल्या आगींच्या घटनांमुळे तात्काळ पाणीपुरवठ्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. फायर हायड्रंट प्रणाली ही जगातील अनेक प्रगत शहरांमध्ये यशस्वीरीत्या वापरली जात असून ती अग्निशमन व्यवस्थेचा अविभाज्य भाग मानली जाते. पुणे शहरातही अशी व्यवस्था विकसित झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत अधिक वेगाने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देता येईल. त्यामुळे पुणे महानगरपालिकेने फायर हायड्रंट प्रणाली उभारणी व आधुनिकीकरणाचा प्रकल्प हाती घेण्याबाबत तसेच त्याकरिता आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करणेकरीता प्रशासनास आवश्यक कार्यवाही करण्याचा ठराव संमत करण्यात यावा.

विषय क्र. ३४५त्वर्य

मा.प्राची अल्हाट यांचे, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

मौजे महंमदवाडी येथील स.नं. २६ या जागेमधून जाणारा १८ मी. व २४ मी. डी.पी. रस्त्यासाठी जागा संपादन करण्याची प्रक्रिया पूर्णत्वास आली आहे पण अद्याप श्री. जालिंदर घुले व श्री मंगेश घुले यांच्या जागेचे भूसंपादन पुणे मनपा मार्फत करण्यात आले नाही.

या कारणास्तव महंमदवाडी येथील १८ मी व २४ मी डी.पी. रस्याचे काम अर्धवट स्थितीत राहत आहे. पुणे महानगरपालिकेकडून संबंधित जागा मालकांना यापूर्वी जागा संपादन केल्याच्या बदल्यात टीडीआर द्वारे योग्य तो मोबदला देण्याची तयारी दर्शविली असताना देखील जागामालकांकडून अवास्तविकपणे मागणी करण्यात येताना दिसून येत आहे.

तरी मौजे महंमदवाडी येथील स.नं. २६ या जागेतील श्री. जालिंदर घुले व श्री. मंगेश घुले यांची डीपी रस्त्यासाठी लागणारी आवश्यक ती जागा सक्तीचे भूसंपादन कायदायान्वे" पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात यावी.

विषय क्र. ३४६त्वर्य

मा.सौ.मयुरी कोकाटे व मा.सौ. निशा मानवतकर यांचे, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

विषयः- सुसगाव येथील सर्वे नंबर 52,49 ते सर्वे नंबर 214 RP विकास आराखड्यातील 24 मीटर [RP 1997] रस्त्याच्या भूसंपादन व विकासाबाबत.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट सुसगाव परिसरातील नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी समस्या निर्माण झाली आहे, नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सध्याच्या सूस गावठाणातून हिंजवडी आयटी पार्क ला जाणाऱ्या या रस्त्यावर वाहतूक कोंडी नित्याची बाब आहे. अनेक अपघात या ठिकाणी होत आहे. आपातकालीन परिस्थितीमध्ये ॲम्बुलन्स, फायर ब्रिगेड वेळेवर पोहोचत नाही. अनेक शैक्षणिक संस्था या परिसरात आहे.

विद्यार्थ्यांना शाळेत वेळेत पोहोचण्यास अनेक वेळा अडचणी निर्माण होत रहे. पिरंगुट MIDC, हिंजवडी आयटी पार्क, सिम्बॉयसिस कॉलेज व हॉस्पिटल, लुपिन फार्मा कंपनी अशा मोठमोठ्या संस्था व अनेक शैक्षणिक संस्था या परिसरात आहेत. त्याचप्रमाणे पुणे मुंबई NH4 वरुन मुळशी कडे जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर होत असतो, त्यामुळे सूस गावावरून मुळशी कडे जाणारा हा रस्ता अपुरा पडत आहे. मुख्य गावठाण गावठाणातून जाणारा हा रस्ता गावठाण परिसरामध्ये रस्ता रुंदीकरण होणे मुश्किल झालेले आहे.

त्यामुळेच या रस्त्याला पर्यायी रस्ता म्हणून (RP 1997] मध्ये दर्शविलेला 24 मीटर रस्ता सर्वे नंबर 52,49 ते सर्वे नंबर 214 या रस्त्याचे भूमी अधिग्रहण करून हा रस्ता त्वरित विकसित केला पाहिजे. सदर RP 24 मीटर रस्त्यालगत अनेक रहिवासी इमारती, गृहनिर्माण प्रकल्प विकसित होत आहेत. सदर रस्त्याच्या डाव्या बाजूला अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी सुद्धा रस्त्या अभावी अडकून पडलेले आहे. शेतमालाला बाजारपेठेत पोहोचण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. परिणामी अस्तित्वात असलेल्या सुस ते मुळशी रस्त्याला पर्यायी मार्ग असलेल्या या 24 मीटर RP मध्ये दर्शविलेला रस्त्या चे भूसंपादन प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, तसेच आवश्यकतेनुसार भूसंपादन थेट खरेदी, डीआरसी,

एफएसआय, किंवा लागू असलेल्या इतर कायदेशीर माध्यमांचा अवलंब करून रस्त्यासाठी आवश्यक जमीन संपादन करण्यात यावे. तसेच संबंधित प्रस्ताव पुणे महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेने संबंधित विभागाकडे भूसंपादन कारवाईसाठी तत्काळ पाठविण्यात यावा. व सदर रस्त्याच्या पूर्ण लांबी रुंदीचा सर्वे करून संपूर्ण लांबीचे निविदा प्रक्रिया राबवण्यात यावी व सदर रस्त्याच्या भूसंपादन व विकासाकरिता बजेट कोड CE20A102/A2-2625 सुस सर्वे नंबर 47 ते सर्वे नंबर 33 व 34 पर्यंत 30 मीटर डीपी रोड विकसित करणे तरतूद रुपये 2 कोटी 55 लाख तरतूद उपलब्ध करून द्यावी व सर्वे नंबर 52 ते सर्वे नंबर 214 RP24 मीटर रस्ता भूसंपादन व विकसित करण्यासाठी वापरण्यात यावी.

तसेच बजेट कोड CE20A102/SA2-3627 प्रभाग क्रमांक 9 सुस गावातील RP रस्ते विकसित करणे तरतूद 5 कोटी रुपये ही सुद्धा सुस सर्वे नंबर 52 ते सर्वे नंबर 214 RP 24 मीटर रस्ता भूसंपादन व विकसित करण्यासाठी वापरण्यात यावी. कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात बावा.

मा. मुख्यसभा मान्यता देईल या भरोश्यावर सदर ठरावाबर मा. महा. आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ३४७त्वर्य

मा.विशाल धनवडे, मा. रुपाली धाडवे व मा.प्रशांत जगताप यांचे, दि. २५/०६/२०२६ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या समाविष्ठ गावातील प्राथमिक शाळा, स्मशान भूमी, पाण्याच्या टाक्या, क्रीडांगणे तसेच सांस्कृतिक केंद्रे यांच्या देखरेखीसाठी नव्याने ५०० सुरक्षा रक्षकांची मान्यता मिळणेस आणि सद्या कार्यरत असलेल्या सुरक्षा एजेन्सीकडून काम करून घेण्यास व त्याचा सविस्तर प्रस्ताव मुख्य लेखापाल व दक्षता विभागाकडून प्रशासकीय मान्यता घेऊन स्थायी समितीस सादर करावे.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका